# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

**मराठी विभाग –वाचन प्रेरणा दिन**

केसरी पुणे, १७ ऑक्टोबर २०१५/३

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

राजगुरुनगर (वार्ताहर) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.

या निमित्ताने वाचनसंस्कृतीची गरज या विषयावर व्याख्यान व चर्चासत्र, पुस्तकांच्या सहवासात या विषयावर परीसंवाद, साहित्यिक प्रश्नमंजूषा, ग्रंथ परीक्षण, विविध वृत्तपत्रातील अग्रलेखांचे वाचन, अग्निपंख व कृष्णाकाठ या पुस्तकांचे अभिवाचन, लोकप्रिय कवितांचे काव्यवाचन, ग्रंथालय भेट अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ एस.बी.पाटील, डॉ.एच.एम.जरे, प्रा.ए.जी.कुलकर्णी, डॉ.बी.डी.अनुसे, डॉ.संजय शिंदे, डॉ.महेश घाडगे, प्रा.एम.एल.मुळूक, विद्यापीठ प्रतिनिधी आकाश नवरे आणि कला व वाणिज्य शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.




राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी दैनिक केसरीचे वाचन करताना विद्यार्थी.

या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्ञानसंपन्न आणि महितीसमृद्ध समाज घडविण्यासाठी वाचन संस्कृतीची गरज असल्याचे म्हटले. आजच्या विद्यार्थ्यांची रुची ही त्या विषयाला मिळणाऱ्या संधीवर अवलंबून राहू लागल्याने अवांतर वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालल्याचे सांगून त्यांनी वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून देणे गरजेचे असल्याचे सांगितले.

प्रा. ए. जी कुलकर्णी यांनी वाचन संस्कृतीचे जीवनातील स्थान या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ एच एम जरे यांनी कलामांच्या अग्निपंख या पुस्तकांसंदर्भात विद्यार्थ्यांशी चर्चा केली. तर डॉ बी डी अनुसे यांनी वाचन कौशल्या बद्दल माहिती सांगितली. आजचा युवक कशासाठी वाचतो, त्याची वाचनामागील उद्दिष्टे व प्रेरणा कोणत्या आहेत, स्वतःच्या वाचनाबबत हा युवक समाधानी आहे का, त्याने काय वाचायला हवे या संदर्भात चर्चा करण्यात आली.

विद्यार्थ्यांना सुमारे १०० वाचनीय पुस्तकांची नावे सांगण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने दीपावलीच्या सुट्टीत किमान ५ अवांतर पुस्तके वाचण्याचा संकल्प केला. या उपक्रमात अक्षय नवरे, भूषण सांडभोर, ओंकार बोंबले, वर्षा काळे, अपेक्षा घनवट, अक्षदा चोरडिया, प्रतिमा वरे, हर्षदा टाकळकर, प्राजक्ता कासारे, प्रदीप खंडागळे, किरण ससाणे, सचिन साबळे या विद्यार्थांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्याने वाचनाची आवड निश्चित करताना ज्ञानप्राप्ती ठेवायला हवी असे सांगून वाचनाचा प्रवास आपल्याला जगण्याचे प्रयोजन समृद्ध करत असल्याचे मत व्यक्त केले. नूतन कोहिणकर या विद्यार्थिनेने आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख